मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये पर्यावरणप्रेमी सायकलस्वारांचा "कुंभमेळा"

## इंद्रायणी नदी संवर्धन जागृतीसाठी 35 हजार सायकलपटूंची रॅली : भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा विश्वविक्रमी उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन जागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025"निमित्ताने भोसरीमध्ये पर्यावरण प्रेमींचा अक्षरशः कुंभमेळा भरला. सुमारे 35 हजार पर्यावरण प्रेमी, नागरिक, सायकलस्वार या रॅलीमध्ये सहभागी झाले. भोसरी येथील ऐतिहासिक गावजत्रा मैदानावर विश्वविक्रमी सायकल फेरी उत्साहात आणि निर्विघ्नपणे संपन्न झाली.\

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, अविरत श्रमदान, सायकल मित्र पुणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, शिवांजली सखी मंच, सारथी हेल्पलाईन यांच्यासह विविध स्वयंसेवी संस्था, संघटना आणि पर्यावरण प्रेमी स्वयंसेवकांच्या पुढाकाराने "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025" चे आयोजन करण्यात आले.

यावेळी उत्तरप्रदेश येथील प्रभू श्रीराम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज, ह.भ.प. संग्रामबापू पठारे महाराज, खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




### दिव्यांग बांधवांचा सहभाग प्रेरणादायी...

» यावर्षीच्या इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉनमध्ये दिव्यांग बांधवांचा सहभाग लक्षवेधी आणि प्रेरणादायी ठरला. महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने आयोजित 'पर्पल जल्लोष' कार्यक्रमाची झलक सायक्लोथॉनमध्ये दिसली. विशेष म्हणजे, इंद्रायणी नदीबाबत कृतज्ञता व्यक्त करीत गंगा आरती करण्यात आली. आगामी काळात इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प आणि नागरिकांमध्ये जनजागृती करुन नदीचे गतवैभव पुन्हा प्राप्त करण्यासाठी एजकुटीने काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच, झुंबा डान्समध्ये आमदार महेश लांडगे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी, अधिकाऱ्यांनी ठेका धरला.

"नदी संवर्धन म्हणजे शहराच्या निरामय आरोग्याचा गाभा आहे. नागरिक, सामाजिक संस्था, प्रतिनिधी स्वयंस्फूर्तीने नदी संवर्धनासाठी एकवटतात. त्यावेळी शहराचे आरोग्य सुरक्षित होत जाते. "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन"सारख्या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाची चळवळ उभी राहील. या रॅलीच्या यशस्वीतेसाठी झटलेल्या आणि सहभागी झालेल्या प्रत्येकाचे मनापासून आभार व्यक्त करतो. यंदाची रॅली महाकुंभ मेळ्याला समर्पित आहे. आपली संस्कृती आणि परंपरा यासाठी कटिबद्ध राहुयात, असे आवाहन करतो.

**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

"गेली नऊ वर्ष पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने "इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन" हा उपक्रम राबवला जात आहे. अनेक संस्था या माध्यमातून नदी संवर्धनासाठी एकत्र आल्या. नागरिक, युवा जोडले गेले. नदी संवर्धन म्हणजे एक प्रकारे आपले भविष्य आरोग्यदायी करण्याचा मूलमंत्र आहे. ही प्रेरणा प्रत्येकाच्या मनात या माध्यमातून रुजवण्याचा आमचा प्रयत्न आहे. या उपक्रमात युवा वर्ग मोठ्या प्रमाणात जोडला जात असून युवकांच्या माध्यमातून नदी, पर्यावरण आणि आपले शहर नक्कीच स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा प्रयत्न प्रत्यक्षात उतरणार आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# अवैध सावकारांवर कडक कारवाई करा : आयुक्त विनयकुमार चौबे

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध सावकारीची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध सावकारीची काही प्रकरणे निदर्शनास आली आहेत. अशा गुन्हेगारांच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी अवैध सावकारांवर कडक कारवाई करावी, असे आदेश पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी सर्व पोलीस ठाण्यांना दिले आहेत.

गेल्या १५ दिवसांत खासगी सावकारांच्या त्रासाला कंटाळून पिंपरी चिंचवड शहरात आत्महत्येच्या दोन घडल्या आहेत. यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. गल्लोगल्ली खासगी सावकार असताना गेल्या सात वर्षांत केवळ चारच गुन्हे दाखल आहेत. खासगी सावकारांसोबतच फायनान्स कंपन्यांचे एजंटही कर्जदाराला दमदाटी व मारहाण करतात. त्यातूनच आत्महत्या सारखे प्रकार वाढू लागले आहेत.



महाराष्ट्र शासनाने अवैध सावकारी गुन्हेगारीच्या संकटाला आळा घालण्यासाठी, त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, अधिक कडक आणि जरब बसविणाऱ्या तरतुदी असणारा विशेष कायदा 'महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४' हा अंमलात आणला आहे. अवैध सावकारीच्या अनुषंगाने नागरीकांनी तक्रारी देण्यास पुढे यावे म्हणून जनजागृती मोहीम राबविण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले आहेत. तसेच नागरीकांकडून भरमसाठ व्याजाने पैसे उकळणारे, नागरीकांचा छळ करणे, त्यांना धमक्या देणा-या सावकारांविरुद्ध तात्काळ कठोर कार्यवाही करण्याचे आदेशही पोलीस आयुक्तांनी दिले आहेत.

भरमसाठ व्याज आकारणी करुन कोणी फसवणूक करत असेल, तसेच धमक्या किंवा छळाचा धोका असल्यास संबंधितांनी तात्काळ पिंपरी चिंचवड पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिगंबर सूर्यवंशी यांनी केले आहे.

# जुन्या वाहनांची माहिती पोलीस ठाण्यात द्या

## अतिरिक्त जिल्हादंडाधिकाऱ्यांचे व्यावसायिकांना आदेश, माहिती न देणाऱ्या व्यावसायिकांवर भारतीय न्याय संहितेचे कलम 223 प्रमाणे कारवाई केली जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात ग्रामीण भागात जुनी वाहने खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी त्यांच्याकडून खरेदी -विक्री होणाऱ्या वाहनांबाबतची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात द्यावी, असे आदेश अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत. माहिती न देणाऱ्या व्यावसायिकांवर भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे कारवाई केली जाणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नागरी वसाहती निर्माण झालेल्या असून जुन्या मोटारसायकली व वाहने यांची खरेदी विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. परंतु याबाबत खरेदी-विक्रीचा योग्य तो तपशील ठेवला जात नसल्याने गुन्हेगारांकडून चोरीच्या वाहनांची खरेदी-विक्री होण्याची दाट शक्यता असते. खरेदी विक्रीबाबत योग्य तपशील उपलब्ध नसल्याने त्याचा गुन्हे उघडकीस येण्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात जुनी वाहने खरेदी विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी त्यांच्याकडून खरेदी विक्री होणाऱ्या वाहनांबाबतची माहिती (वाहन क्रमांक, इंजिन, चासी क्रमांक, मूळ मालकाचे नाव, मूळ गावचा व सध्या राहात असलेले ठिकाणाचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, ओळखपत्र, वाहनांचे आरसी, टीसी पुस्तक, खरेदी करणाऱ्याचे नाव, मूळ गावचा व सध्या राहात असलेल्या ठिकाणाचा संपूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व ओळखपत्र आदी) दर ७ दिवसांनी स्थानिक पोलीस ठाण्याला द्यावेत, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



### ड्रोन कॅमेराद्वारे चित्रीकरण करण्यास प्रतिबंध आदेश जारी

» जिल्ह्यात महत्त्वाची धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था असून दहशतवादी कारवायांमध्ये ड्रोन कॅमेराद्वारे टेहळणी होऊन त्याचा अतिरेकी कारवायांमध्ये उपयोग केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दौंड, बारामती, शिरूर तालुक्याच्या परिसरामध्ये रात्रीच्या वेळी ड्रोन उडत असल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाळू माफिया देखील टेहळणीसाठी ड्रोनचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ड्रोनच्या मध्यमातून टेहळणी करून इतर प्रकारच्या चोऱ्याही होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे हे प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

### भाडेकरूंची माहिती पोलीस ठाण्याला देण्याचे आदेश

» पुणे ग्रामीण जिल्ह्यात घरमालकांनी त्यांच्या घरात भाडेकरू ठेवताना भाडेकरूचे नाव, सध्याचा पत्ता, मूळ पत्ता, दोन छायाचित्रे, त्यांना ओळखणाऱ्या व्यक्तीचे नाव व पत्ता, भाडे करारनामा, ओळखपत्र आदींबाबतची कागदपत्रे स्थानिक पोलीस ठाण्याकडे सादर करावीत, असे आदेश अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी दिले आहेत. ग्रामीण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहत असल्याने तेथे काम करणाऱ्या लोकांना घरे भाड्याने दिली जातात. दहशतवादी कारवाया व गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर एखादा गुन्हा घडल्यावर त्याची तत्काळ उकल करण्यासाठी भाडेकरू म्हणून राहणाऱ्या लोकांची संपूर्ण माहिती पोलीस ठाण्याकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून घरमालकांनी ही माहिती पोलीस ठाण्याला सादर करावी. भाडेकरूंची माहिती स्थानिक पोलीस ठाण्याला न दिल्यास घरमालक हे भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ प्रमाणे दंडनीय कारवाईस पात्र राहतील, असेही आदेशात नमूद केले आहे.

# पुण्यामध्ये नॅशनल गेम्सच्या आयोजनासाठी प्रयत्न करणार, मुरलीधर मोहोळ यांची माहिती

## बालेवाडी येथील छत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित सब ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. उद्योजक पुनीत बालन यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. यावेळी पुनीत बालन यांनी स्पर्धेतील सहभागी पदक विजेत्यांसाठी रोख दहा लाख रुपयांची बक्षिसांची घोषणा केली, यामध्ये सुवर्णपदक विजेत्यास 11,000 रुपये, रोप्य पदक विजेत्यास 7000 रुपये तर दोन्ही कांस्यपदक विजेत्यास पाच हजार प्रत्येकी असे बक्षीस जाहीर केले.

महाराष्ट्रात आणि पुण्यामध्ये पुन्हा नॅशनल गेम्सचे आयोजन व्हायला हवे आणि त्यासाठी आपण प्रयत्न करूया, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांनी केले. बालेवाडी येथील छत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित सब ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.




यावेळी मोहोळ म्हणाले की, ज्यूदो हा खेळ माझ्या आवडत्या कुस्ती खेळाशी खूप साम्य असून यातील डावही कुस्तीमध्ये वापरले जातात त्यामुळे ज्यूदो आणि कुस्ती हे युद्धकलेचे खेळ, भाऊभाऊच आहेत, असेही त्यांनी सांगितले.

स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. उद्योजक पुनीत बालन यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. यावेळी पुनीत बालन यांनी स्पर्धेतील सहभागी पदक विजेत्यांसाठी रोख दहा लाख रुपयांची बक्षिसांची घोषणा केली, यामध्ये सुवर्णपदक विजेत्यास 11,000 रुपये, रोप्य पदक विजेत्यास 7000 रुपये तर दोन्ही कांस्यपदक विजेत्यास पाच हजार प्रत्येकी असे बक्षीस जाहीर केले. यावेळी व्यासपीठावर इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सचे तथागत मुखर्जी आणि ज्यूदो फेडरेशनचे पदाधिकारी वीरेंद्र वशिष्ठ, सी एस राजन यांसह द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त जीवन शर्मा, अर्जुन पुरस्कार प्राप्त यशपाल सोलंकी, राज्य ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष धनंजय भोसले यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

समारंभास पॅरिस येथील ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक विजेता अर्जुन पुरस्कार प्राप्त सचिन खिलारे यांना विशेष आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य ज्यूदो संघटनेचे महासचिव शैलेश टिळक यांनी तर आभार प्रदर्शन तांत्रिक सचिव दत्ता आफळे यांनी केले. स्पर्धेसाठी सबज्युनियर गटामध्ये 29 राज्यातील 235 मुले आणि 230 मुली खेळाडू सहभागी झाले आहेत.

यावेळी व्यासपीठावर इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सचे तथागत मुखर्जी आणि ज्यूदो फेडरेशनचे पदाधिकारी वीरेंद्र वशिष्ठ, सी एस राजन यांसह द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त जीवन शर्मा, अर्जुन पुरस्कार प्राप्त यशपाल सोलंकी, राज्य ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष धनंजय भोसले यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

समारंभास पॅरिस येथील ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक विजेता अर्जुन पुरस्कार प्राप्त सचिन खिलारे यांना विशेष आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य ज्यूदो संघटनेचे महासचिव शैलेश टिळक यांनी तर आभार प्रदर्शन तांत्रिक सचिव दत्ता आफळे यांनी केले. स्पर्धेसाठी सबज्युनियर गटामध्ये 29 राज्यातील 235 मुले आणि 230 मुली खेळाडू सहभागी झाले आहेत.

# पालिकेच्या शाळांमध्ये ई-लर्निंगला मिळणार गती

## महासभेच्या बैठकीत प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांची विविध विषयांना मंजुरी



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या ई-लर्निंग प्रकल्पाअंतर्गत शाळा, कार्यालयांना इंटरनेट बँडविड्थ सेवा उपलब्ध करणे, रुग्णालयामध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क, वसतिगृह शुल्क, प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करणे, यासह विविध विषयांना प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीने मान्यता दिली.

महापालिकेच्या ई-लर्निंग प्रकल्पाअंतर्गत शाळा, कार्यालयांना इंटरनेट बँडविड्थ सेवा उपलब्ध करणे, रुग्णालयामध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क, वसतिगृह शुल्क, प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा करणे, यासह विविध विषयांना प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीने मान्यता दिली.

महापालिका स्थायी समिती आणि महासभेत आवश्यक असलेल्या विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या शाळा आणि कार्यालयांना ई-लर्निंग प्रकल्पाअंतर्गत बँडविड्थ सेवा उपलब्ध करून देणे, महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा अधिकाधिक वृद्धिंगत करणे, रुग्णालयांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता करणे, या दृष्टिकोनातून नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्स (एनबीईएमएस) नवी दिल्लीमार्फत रुग्णालयात 'एनबीईएमएस पदविका अभ्यासक्रम' सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

त्यानुसार एनबीईएमएस यांच्याकडून भोसरी व थेरगाव रुग्णालय यांना उपलब्ध पायाभूत सोयी-सुविधा, मनुष्यबळ यांच्या मानांकनानुसार पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगी मिळाली आहे. या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींकडून घ्यावयाचे प्रवेश शुल्क, वसतिगृह शुल्क आणि त्यांना अदा करावयाचे विद्यावेतन याबाबत विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. महापालिका स्वच्छ महाराष्ट्र व भारत अभियानात दरवर्षी सहभाग घेते. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या दृष्टीने आढावा घेतला. स्वच्छ सर्वेक्षण अभियानाच्या अनुषंगाने शहरातील एकूण सार्वजनिक शौचालयांपैकी ज्यांचा अजिबात वापर होत नाही, जे शौचालय दुरावस्थेत आहेत. मोडकळीस आले आहेत त्यांचे सर्वेक्षण करून त्यांना निष्कासित करण्याचे ठरले होते. त्यानुसार शौचालय निष्कासनासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक सिंह यांनी मान्यता दिली.

### मुख्यमंत्र्यांना दोन तास विलंब

» मोरवाडी स्मशानभूमी येथे पर्यावरणपूरक वायुप्रदूषण नियंत्रक यंत्रणा बसवणे, महापालिकेच्या ब,फ,ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत विविध ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, महापालिकेच्या मुख्य इमारत, एलबीटी कोठारे, क्षेत्रीय कार्यालये, करसंकलन कार्यालये, स्पर्धा परीक्षा केंद्र, अभ्यासिका अशा ठिकाणी डास, माश्या, ढेकूण, झुरळ, उंदीर, घुशी इत्यादींचा उपद्रव होऊ नये आणि त्यावर नियंत्रण आणण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने औषध फवारणी करणे, अशा विविध विषयांना प्रशासक सिंह यांनी बैठकीत मान्यता दिली.

# पथविक्रेत्यांसाठी विशेष आर्थिक नियोजन; महापालिका बनवणार स्मार्ट हॉकर झोन

## अर्थसंकल्पात 10 कोटींची तरतूद, आयुक्त शेखर सिंह यांची फेरीवाला क्रांती महासंघाला ग्वाही



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील पथ विक्रेत्यांसाठी विशेष आर्थिक नियोजन केले आहे. स्मार्ट हॉकर्स झोन निर्मितीसाठी १० कोटीपेक्षा अधिक निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या शिष्टमंडळाला महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील पथ विक्रेत्यांसाठी विशेष आर्थिक नियोजन केले आहे. स्मार्ट हॉकर्स झोन निर्मितीसाठी १० कोटीपेक्षा अधिक निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या शिष्टमंडळाला महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघ, कष्टकरी संघर्ष महासंघाच्या शिष्टमंडळाने शनिवारी (दि. १८) आयुक्त शेखर सिंह तसेच उपायुक्त मुकेश कोळप यांची भेट घेऊन फेरीवाला योजनेबाबत चर्चा केली. यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते, नवनियुक्त शहर विक्रेता समिती सदस्य किरण साडेकर, राजू बिराजदार, किसन भोसले, सलीम डांगे, प्रल्हाद कांबळे, अलका रोकडे यांचे सह महासंघाचे महिलाध्यक्षा वृषाली पाटणे, कार्याध्यक्ष इरफान चौधरी,संभाजी वाघमारे,लक्ष्मण शेरखाने,सुनील कदम, बालाजी लोखंडे, रवींद्र गायकवाड,महेंद्र वाघमारे, नंदू आहेर,सलीम शेख, कमल लष्करी आदी उपस्थित होते.

महापालिका कार्यक्षेत्रामध्ये अतिक्रमण कारवायांत वाढ झाली असून साहित्य आणि माल जप्त करण्यात येत आहे. हे अन्यायकारक असून कारवाई थांबवण्यात यावी. लवकरच फेरीवाल्यांना प्रमाणपत्र आणि ओळखपत्र देण्यात यावे. तसेच अगामी अर्थसंकल्पामध्ये १० कोटी रुपयांची तरतूद करावी व नियोजनासाठी लवकरच समितीची बैठक घ्यावी, अशी मागणी नखातेंसह समिती सदस्यांनी केली.

त्यावर हॉकर्स झोनसाठी अंदाजपत्रकात १० कोटीपेक्षा अधिक आर्थिक तरतूद करू, असे आश्वासन आयुक्त सिंह दिले. स्मार्ट हॉकर्स झोन निर्मितीसाठी १० कोटीपेक्षा अधिक निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाच्या शिष्टमंडळाला महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

### फेरीवाल्यांना मिळणार लवकरच प्रमाणपत्र

» लवकरच फेरीवाल्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येईल. याबाबत लवकर बैठक घेऊन नियोजन करण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले आहे. तसेच, सुसज्ज हॉकर झोन निर्मितीसाठी आपण चांगल्या पद्धतीने नियोजन करणार असल्याचेही त्यांनी फेरीवाला समितीला सांगितले आहे.

# भोरमधील लाडक्या बहिणी घेणार पालकमंत्र्यांची भेट

## चोरट्यांचा वेळीच बंदोबस्त करा अशा मागणीचे निवेदन भोर पोलीस स्टेशनला श्रीपती नगर मधील महिलांनी दिले.

**पुणे | प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपूर्वी भोर शहरातील श्रीपती नगर भागामध्ये चोरट्यांनी जवळपास 26 लाखाहून अधिक किमतीचा ऐवज चोरून धुमाकूळ घातला आहे. याच पार्श्वभूमीवर चोरट्यांचा वेळीच बंदोबस्त करा अशा मागणीचे निवेदन आज भोर पोलीस स्टेशनला श्रीपती नगर मधील महिलांनी दिले.

सध्या मांढरदेवीची यात्रा सुरू आहे. पौष पौर्णिमा ते माघ पौर्णिमा या महिन्याभरामध्ये मांढरदेवीला अनेक भक्त, भाविक राज्यातून परराज्यातून मांढरदेवीला भोर मार्गे येत जातात. आणि याच यात्रा काळामध्ये चोरट्यांचा सुळसुळाट देखील झालेला पाहायला मिळतोय. मागील काही वर्षांपासून यात्रेनिमित्त चोर देखील शहरात धुमाकूळ घालत आहेत. नुकताच भोरमध्ये अज्ञात चोरट्यांनी 26 लाखांचा ऐवज हा लंपास केला आहे. शहरातील मध्यवर्ती भागात घर फोड्या केल्या आहेत. घरातील किमती वस्तू यांची देखील नासधूस केली आहे.

श्रीपती नगर परिसरात रात्री १२ वाजेपासून ते पहाटे ५ वाजेपर्यंत पोलिसांचे गस्त पथक कार्यरत ठेवावे. अशी मागणी महिलांनी केली. महिलांनी भोर पोलीस ठाण्यातील ठाणे अंमलदार हवालदार वर्षा भोसले यांच्याकडे निवेदन सुपूर्त केले.




### आमदारांकडून सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष

» या संदर्भात स्थानिक आमदारांशी किंवा नेत्यांशी संपर्क साधला असता त्यांच्याकडून देखील लोकांना कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. जर लोकप्रतिनिधीच असे वागत असतील तर सामान्य नागरिकांनी कोणाकडे न्याय मागावा असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### आठवडे बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट

» भोरच्या आठवडे बाजारात मागच्या काही महिन्यांपासून पाकीट मारणे, सोनसाखळी चोरणे, मोबाईल चोरणे, वृद्ध लोकांची गोड बोलून फसवणूक करणे अशा अनेक चोरीच्या घटना घडताना दिसत आहेत. मात्र पोलिसांकडून यावर कोणतीही कारवाई केली जात नाही.

### मांढरदेवी यात्रा आणि चोरीच्या घटना

» सध्या मांढरदेवीची यात्रा सुरू आहे. पौष पौर्णिमा ते माघ पौर्णिमा या महिन्यात मांढरदेवीची यात्रा भरत असते. या मांढरदेवीच्या यात्रेला अनेक भक्त, भाविक राज्यातून परराज्यातून भोर मार्गे येत जात असतात. आणि याच यात्रा काळामध्ये चोरट्यांचा सुळसुळाट पाहायला मिळतो. मांढरदेवीची यात्रा आणि चोरी हे समीकरण गेल्या कित्येक वर्षांपासून पाहायला मिळत आहे. मात्र तरीदेखील खबरदारी म्हणून पोलिसांकडून कोणतीही यंत्रणा राबावली जात नाही. या चोरट्यांचा बंदोबस्त करण्यात पोलीस यंत्रणेला अपयश येत आहे. यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### शहरातील सीसीटीव्ही निष्क्रिय

» भोर शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत, मात्र हे सीसीटीव्ही कामच करत नाही आहेत.जवळजवळ सगळेच सीसीटीव्ही बंद आहेत. याबद्दल नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ केली.

### 6 वर्षांपासून नगरसेवक बेपत्ता

» स्थानिक लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी नगरसेवक असतात. मात्र श्रीपती नगर मधील नगरसेवक मागच्या ६ वर्षांपासून बेपत्ता आहेत. निवडणूका झाल्यानंतर या नेत्यांनी स्थानिक लोकांकडे दुर्लक्ष केल्याचे पाहायला मिळत आहे. निवडणुका आल्या कि हे नेते आम्ही हे करू ते करू असे आश्वासन देतात मात्र एकदा निवडून आले कि ते आपल्या विभागाकडे दुर्लक्ष करतात.

# छत्रपती शिवाजी महाराज चषक स्पर्धेत यंदा पुरुषांमध्ये मुंबई तर महिलांमध्ये पुणे ग्रामीणची बाजी

## 'नमामि चंद्रभागा' या महत्वकांक्षी प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ भिगवण येथे सरपंच दीपिका क्षीरसागर यांच्या हस्ते पार पडला.

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या यजमान पदाखाली बारामती येथे सुरू असलेल्या २३ व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक वरिष्ठ पुरूष व महिला गट कबड्डी स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सायंकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात पुरूष विभागात मुंबई शहर पूर्व तर महिला विभागात पुणे ग्रामीण संघांनी विजेतेपद मिळविले.



स्पर्धेचे पारितोषिक वितरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत फुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अतिरिक्त पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, विभागीय अधिकारी वैभव नावडकर, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्य बॅंकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर, सुहास मापारी, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले, दादा देवकाते, स्पर्धा निरिक्षक रविंद्र देसाई, पंच प्रमुख सदानंद मांजलकर, सहपंचप्रमुख अनिल यादव, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएसनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, सचिव दत्तात्रय झिंजुर्डे, अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम जाधव, शकुंतला खटावकर व माया आक्रे आदी उपस्थित होते.

खेळांडूंकडे जिंकण्यासाठी खिलाडू वृत्ती असावी. खेळाडूंनी सर्वोत्तम क्षमतेने खेळले पाहिजे. बारामतींकरांना कला क्रीडा, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात आनंद मिळाला पाहिजे यासाठी माझा सातत्याने प्रयत्न असतो असे सांगत खेळाडूंना भरीव बक्षिस मिळावे अशी सकारात्मक भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथे केले. ते बारामती येथे छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

पुणे ग्रामीण व मुंबई शहर पुर्व पुरुषांच्या अंतिम सामन्यात मुंबई शहर पुर्व संघाने पुणे ग्रामीण संघावर ३५-३१ असा विजय मिळवित छत्रपती शिवाजी महाराज चषकावर आपले नाव कोरले. मद्यंतराला मुंबई शहर पुर्व संघाकडे १७-९ अशी आघाडी होती. मुंबई शहर पुर्वच्या प्रणय राणे व शार्दुल पाटील यांनी आपल्या जोरदार खेळाच्या जोरावर आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर संकेत सावंत याने उत्कृष्ठ पकडी घेतल्या. पुणे ग्रामीणच्या अक्षय सूर्यवंशी व अजित चौहान, जीवन डोंबले यांनी जोरदार प्रतिकार केला. तर स्वप्नील कोळी याने पकडी घेतल्या.

### पुणे ग्रामीण व मुंबई शहर पश्चिम

» महिलांच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई शहर पश्चिम संघावर ३७-२८ असा विजय मिळवित छत्रपती शिवाजी महाराज चषकावर आपले नाव कोरले. मद्यंतराला पुणे ग्रामीण संघाकडे २०-१५ अशी आघाडी होती. पुणे ग्रामीणच्या खेळाडूंनी सामन्याच्या सुरवातील अत्यंत अडखळत सुरवात केली होती. मात्र थोड्यात वेळा सलोनी गजमल व निकिता पडवळ यांनी आपल्या अत्यंत आक्रमक खेळाने संघाला सावरले व संघाला विजय मिळवून दिला. रेखा सावंत हिने मुंबई शहर पश्चिमची संघनायक असलेल्या सोनाली शिंगटेच्या पकडी घेत विजयात मोलाचा वाटा उचलला. मुंबई शहर पश्चिमच्या सोनाली शिंगटे हिने एकाकी लढत दिली. तर पूर्णिमा जेधे व साधना विश्वकर्मा यांनी चांगल्या पकडी केल्या.